# पुणे महानगरपालिका
# वृक्ष प्राधिकरण

## जाहिर आवाहन

- पुणे महानगरपालिका अधिकार क्षेत्रास महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चा कायदा लागू करण्यात आला आहे.
- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्षसंरक्षण व संवर्धन नियम २००९ व मे.उच्च न्यायालय,मुंबई यांचे दिनांक २० सप्टेंबर २०१३ रोजीच्या आदेश व महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम,२०२१ नुसार वृक्ष प्राधिकरणाचे कामकाज करण्यात येते.
- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील **प्रकरण पाच कलम ८ (१)** – **''कोणत्याही नागरी क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आणल्याच्या दिनांकाला व त्या दिनांकानंतर त्यावेळी अंमलात असलेली कोणतीही रूढी,परिपाठ,करार किंवा कायदा यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणीही व्यक्ति वृक्ष अधिकाऱ्यांच्या पूर्व–परवानगीखेरीज त्या नागरी क्षेत्रातील कोणत्याही, तिच्या स्वत:च्या मालकीच्या किंवा अन्य जमिनीतील झाड तोडणार नाही किंवा तोडण्यास कारणीभूत होणार नाही.''** असे नमूद केलेले आहे.
- सदर कायद्यानुसार विनापरवाना झाडे जाळणे, तोडणे किंवा कोणत्याही प्रकारे झाडास हानी पोहचवणे असे कोणतेही कृत्य करणे हा गुन्हा आहे. याबाबत महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम,२०२१ मधील कलम ८ नुसार –**''या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून जी व्यक्ति कोणतेही झाड तोडील किंवा कोणतेही झाड तोडण्यास कारणीभूत होईल किंवा वृक्ष अधिकाऱ्याने किंवा वृक्ष प्राधिकरणाने लादलेल्या शर्तीचे किंवा दिलेल्या आदेशांचे पाल करण्यात वाजवी सबबीशिवाय कसूर करील किंवा वृक्ष प्राधिकरणाच्या कोणत्याही सदस्यास किंवा वृक्ष अधिकाऱ्यास किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास या अधिनियमाखालील त्यांची कर्तव्ये पार पाडण्यात स्वेच्छेने अडथळा आणील त्या व्यक्तीला अपराधसिध्दीनंतर , प्रत्येक अपराधाकरिता शासनाद्वारे अधिसुचित करण्यात येईल अशा पध्दतीचा वापर करून, काढलेल्या झाडाच्या मुल्याइतके परंतू ,एक लाख रूपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या आणि एक आठवड्यापेक्षा कमी नसेल व एक वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाचीदेखील शिक्षा होईल.''** असे नमूद केलेले आहे.

- विकसनाच्या कामास अडथळा करणारी वृक्ष , आरोग्य व जीवितास धोका असणारी वृक्ष अथवा अन्य कोणतेही वृक्ष तोडावयाची असल्यास अथवा विस्तार/फांद्या कमी करणेचे झाल्यास मा.अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण /वृक्ष प्राधिकरण समिती/मा.वृक्ष अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
- महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग अधिसुचना क्र.पीएमसी–२०२०/प्र.क्र.३२२/नवि–२२,दिनांक – ३०/६/२०२१ अन्वये, पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने २३ गावांचा समावेश झालेला आहे. सबब, यापुर्वी व सदर अधिसुचनेनुसार समाविष्ठ करण्यात आलेल्या गावांमधील (पुणे महानगरपालिका हद्दीमधील) वृक्षांच्या फांद्या छाटणे/विस्तार कमी करणे,धोकादायक वृक्ष,बांधकामास अड्थळा करणारे वृक्ष पुर्ण काढणे/पुनर्रोपण करणे,बांधकामास पुर्णत्वाचा दाखला घेणे व बांधकाम पुर्व ना हरकत पत्र घेणेसाठी प्रस्ताव संबंधित विभागाचे मा.महापालिका सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,पुणे महानगरपालिका यांचेकडे सादर करावयाचा आहे.
- शहरातील सर्व नागरिकांना जाहिर आवाहन करण्यात येते की ,पावसाळी हंगाम सुरू आहे. पावसाळी हंगामामध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्ष/वृक्षांच्या फांद्या पडत असतात. यामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा होत असतो. तरी, पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये पावसाळी हंगामामध्ये पडलेल्या वृक्षांच्या फांद्या/वृक्ष त्वरित हलविण्यासाठी ,सोबत जोडलेल्या संपर्क क्रमांकावर संबंधित विभागाचे मा.महापालिका सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी (१ ते १५ क्षेत्रिय कार्यालय) यांचेशी किंवा वृक्ष प्राधिकरण विभाग – संपर्क क्रमांक ०२०–२५५०१५५३ व अग्निशामक विभाग – संपर्क क्रमांक –१०१ , ०२०–२६४५१७०६ , ०२०–२६४५१७०७ या क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा.
- आपणास पुणे महानगरपालिकेच्या www.complaints.punecorporation.org या संकेतस्थळावर ऑनलाईन तक्रार करता येईल.

(अशोक घोरपडे)
मुख्य उद्यान अधिक्षक
तथा सदस्य सचिव,वृक्ष अधिकारी
पुणे महानगरपालिका